**दिनांक ०६/०९/२०२४**

**प्रेसनोट**

## <u>सार्वजनिक गणेशोत्सव सन २०२४ बाबत.</u>

दि.०७/०९/२०२४ ते दिनांक १७/०९/२०२४ या कालावधीत गणेशोत्सव साजरा केला जाणार आहे. पुणे शहरात सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे **एकूण ३७९८** असून **घरगुती गणपतींची संख्या एकूण ६,६४,२५७** इतकी आहे.

**सन २०२४ मध्ये पुणे आयुक्तालयात गणेशोत्सव बंदोबस्ता करीता लावण्यात येणारे मनुष्यबळ**

| | अपोआ | पोउआ | सपोआ | पोनि | सपोनि / पोउनि | अंमलदार | होमगार्ड | एस.आर पी.एफ कंपनी | क्यु.आर.टी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **बाहेरुन उपलब्ध मनुष्यबळ** | ०० | ०० | ०२ | ५ | १७५ | ५० | ११०० | १ | - |
| **पुणे शहर आयुक्तालयाकडून उपलब्ध होणारा बंदोबस्त** | ०४ | १० | २१ | १२३ | ३९३ | ४५५४ | ०० | ०० | १० टिम |
| **एकूण** | **४** | **१०** | **२३** | **१२८** | **५६८** | **४६०४** | **११००** | **१** | **१० टिम** |

वरील बंदोबस्त व्यतिरिक्त बी.डी.डी.एस.पथके, क्यु.आर.टी.चे अधिकारी,अंमलदार तैनात करण्यात आले असून वाहतूक नियंत्रणाकरीता वाहतूक शाखेकडील पोलीस अधिकारी व अंमलदार नेमण्यात येणार आहेत.

पुणे शहरात गणेशोत्सव काळात कायदा व सुव्यवस्था अबाधीत रहावी याकरीता **१७४२** लोकांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे.

गणेशोत्सव काळात पुणे शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधीत रहावी, गणेशोत्सव शांततेत पार पडावा याकरीता गणेशोत्सव मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, शांतता समिती, पोलीस मित्र समिती यांना पोलीस आयुक्त, परिमंडळीय पोलीस उप-आयुक्त, पोलीस स्टेशन स्तरावर अशा एकुण **२०२** बैठका घेण्यात आल्या असून गणेशोत्सव मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते यांना गणेशोत्सव साजरा करणेबाबत मार्गदर्शन पर सुचना दिल्या.

- **गणेशोत्सव काळातील काढलेले आदेश-**

**१)** गणेशोत्सव काळात गणेश मंडळे त्यांच्या स्थापनेच्या ठिकाणी तसेच मिरवणुकीमध्ये ज्वालाग्रही (रॉकेल, डिझेल, पेट्रोल, गॅस इ.) पदार्थाच्या सहाय्याने आगीचा लोळ उत्पन्न करतात किंवा हवेत सोडतात याकरीता कोणत्याही ज्वालाग्रही (रॉकेल, डिझेल, पेट्रोल, गॅस इ.) पदार्थाच्या सहाय्याने आगीचा लोळ निर्माण करणेस किंवा हवेत सोडणेस **बीएनएसएस सन २०२३ चे कलम १६३ प्रमाणे दिनांक ०७/०९/२०२४ रोजी ००.०१ ते दि.२१/०९/२०२४ या कालावधीत प्रतिबंधात्मक आदेश जारी करण्यात आले आहेत.**

**२)** गणेशोत्सव कालावधीत गणेश प्रतिष्ठापना व गणेश विसर्जन मिरवणूक व ईद ए मिलाद सणाचे मिरवणूका यांच्या उल्लेख केलेल्या कार्यक्रमाची वेळ तसेच मार्ग निश्चित करण्यासाठी व त्यामध्ये ध्वनीवर्धक व ध्वनीक्षेपक व्यवस्थेचा योग्य वापर करण्यासाठी महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३६ प्रमाणे **दिनांक ०७/०९/२०२४ रोजी ०६.०० ते दि.२१/०९/२०२४ रोजी २२.०० वा चे कालावधीत** प्रतिबंधात्मक आदेश जारी करण्यात आले आहेत.

३) गणेशोत्सव कालावधीत गणेश प्रतिष्ठापना व गणेश विसर्जन मिरवणूक दरम्यान म्युझिक सिस्टीम (स्पिकर) साऊंड सिस्टीमच्या ध्वनीच्या डेसिबल नियमांची मर्यादा प्रतिबंधित राहावी याकरीता महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३६ प्रमाणे **दिनांक ०७/०९/२०२४ रोजी ०६.०० ते दि.२१/०९/२०२४ रोजी २०.०० वा चे कालावधीत** प्रतिबंधात्मक आदेश जारी करण्यात आले आहेत.

४) गणेशोत्सव कालावधीत सार्वजनिक ठिकाणी, रस्त्यावर, रुग्णालयाजवळ, मानवी जिवितास धोका, इजा पोहचेल अशा रितीने फटक्यांची आतिषबाजी करण्यास महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३३ (१) यु प्रमाणे **दिनांक ०७/०९/२०२४ रोजी ०६.०० ते दि.२१/०९/२०२४ रोजी २२.०० वा.चे कालावधीत** प्रतिबंधात्मक आदेश जारी करण्यात आले आहेत

५) दिनांक ०७/०९/२०२४ ते दिनांक १८/०९/२०२४ या कालावधीत किरकोळ मदयविक्रीच्या सर्व अनुज्ञप्ती (एफएल-२,एफएल-३,सीएल-३,एफएलबीआर-२, फॉर्म-ई,फॉर्म ई-२ व ट,ड.-१) बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी,पुणे यांचेकडून प्राप्त झाले आहेत.

६) गणेशोत्सव कालावधीत ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण)-२०१७ सुधारीत अंमलबजावणी बाबत सन २०२४ मधील सार्वजनिक गणेशोत्सव कालावधीत दिनांक १२/०९/२०२४, दि.१३/०९/२०२४, दि.१४/०९/२०२४, दि.१५/०९/२०२४, दि.१६/०९/२०२४ व दि.१७/०९/२०२४ असे एकूण ०६ दिवस सकाळी ०६.०० ते रात्रौ २४.०० वा. पर्यंत ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धक याचा वापर करणेबाबत मा.जिल्हाधिकारी, पुणे यांनी आदेश पारीत केले आहेत.

पुणे शहर पोलीसांतर्फे गणेश उत्सव २०२४ दरम्यान गणेश मंडळात येणा-या गणेश भाविकांच्या सुरक्षेकरीता व पोलीस बंदोबस्त यांचे चांगले नियोजन करीता करता यावे यासाठी **माय सेफ पुणे ॲप** मध्ये विशेष पेट्रोलीग करीता सर्व गणेश मंडळांचे मॅपींग करण्याल आली आहेत. गणपती विसर्जनाचे दिवशी बंदोबस्त देखरेख व मंडळांचे लोकेशनची माहिती या ॲपव्दारे प्राप्त होणार आहे. तसेच याव्दारे नागरीकांकरीता एक पेज (लिंक) सुरु करण्यात येणार असून त्यात नागरीकांना वाहन पार्कीगची जागा, पोलीस मदत केद्रे, पादचारी मार्ग, विसर्जन दिवशी मिरवणुक मार्ग, बंद रस्ते व शहरातील प्रमुख गणेश मंडळाचे मिरवणुकी दरम्यान त्यांची सदयस्थिती बद्दलची माहिती मिळणार आहे.

तसेच पुणे शहर पोलीसांतर्फे नागरीकांचे सोयीकरता पुणे शहरातील एक **व्हीडीओ** तयार करण्यात आलेला आहे त्यामध्ये नागरीकांना पार्कीगची जागा व पोलीस मदत केद्र, पादचारी मार्ग, विसर्जन दिवशी मिरवणुक मार्ग, विसर्जन घाट बंद रस्ते वगैरे माहिती प्राप्त होणार आहे.

संपुर्ण पुणे शहरातील गर्दीचे ठिकाणी पीक पॉकेटींग, छेडछाड विरोधी पथक व ॲन्टी चैन स्नॅचिंग पथके गणेश उत्सव काळात नेमण्यात आलेली आहेत. तसेच गणेश उत्सव काळात पुणे शहरातील वाहतुकीतील करण्यात आलेल्या बदला संदर्भात वेगळ्या प्रेस नोट देण्यात आलेल्या आहेत.


महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय
पुणे शहर पोलीस आयुक्तालय
पुणे